पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १८/१२/२०१९

## मौजा गोमणी येथे भव्य महिला जनजागरण मेळावा संपन्न

मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बंसल सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. मनीष कलवानिया सा़ो. आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अहेरी श्री. बजरंग देसाई सा़ो. यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन मुलचेरा हद्दी मधील संवेदनशिल अशा मौजा गोमणी येथे महिला भव्य जनजागरण मेळावा तसेच राणी दुर्गावती हस्तकला स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते.

सदर मेळाव्यात शासकीय विभागांनी महिलांना शासकीय योजनांची माहिती दिली. आरोग्य अधिकारी सुंदरनगर यांनी उपस्थित महिला तसेच मुलींची आरोग्य तपासणी केली व औषधांचे वाटप केले आणि मार्गदर्शन केले. राणी दुर्गावती स्पर्धेमध्ये ११ महिलांनी आपला सहभाग नोंदविला होता. स्पर्धेमधील हस्तकलांना मान्यवरांचे हस्ते निवड करुन तीन महिलांची निवड करुन त्यांना प्रथम व्दितीय व तृतीय अनुक्रमे ३,०००/-, २,०००/-, व १,०००/- रुपये रोख बक्षीस देण्यात आले. गरजु महिलांना ब्लॅंकेट, १० घमेले, १० चटई व १० महिलांना साडी चोळीचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना वही, बुकपेन, पेन्सीलचे वाटप करण्यात आले. सदर प्रसंगी नक्षल गावबंदी योजनेची माहीती देण्यात आली. दर मेळाव्यात मान्यवर सरकारी अधिकारी, सभापती पंचायत समीती तसेच हद्दीमधील सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, महिला, पुरुष व शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच शिक्षक, शिक्षिका असे ६०० ते ७०० लोक सहभागी झाले होते. पोलीस दलातर्फे मेळाव्यास उपस्थितांनच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.


भव्य जनजागरण मेळावा
राणी दुर्गावती


महिला
भव्य जनजागरण मेळावा
पोलीस स्टेशन मुलचेरा
पोलीस स्टेशन, मुलचेरा
राणी दुर्गावती
महिला हस्तकला स्पर्धा